REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ जानेवारी, १९४४ अंक ३

**चटण्या तयार मिळतात !**
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(३) १० शुक्रवार, पुणें.

**ए. बी. सी. कॉइल्स**
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
**लायसॉफ**
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि भागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

महाराष्ट्र टेक्टाइलस् लि., यांच्या
**राजा रघुनाथराव मिल्स, भोर**
येथील माल, धोतरजोड्या, शर्टिंग, कोटिंग, मांजरपाट पुण्यांत कंट्रोल भावानें घाऊक व किरकोळ
मिळण्याचें ठिकाणः--पायोनियर डाइंग हाऊस
दातेवाडी, भिकारदास मारुती रोड, सदाशिव पेठ, पुणें.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**
गिरगांव मुंबई नं. ४
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### कोळशाची वाढती किंमत व निर्गत व्यापार

ग्रेटब्रिटनचा निर्गत व्यापार वाढणें तेथील उत्पादनावर अवलंबून आहे आणि उत्पादन हें यंत्रें चालविण्यास लागणाऱ्या कोळशाच्या उतरत्या पुरवठ्यानें व त्याच्या वाढत्या किमतीनें मर्यादित होणार आहे, असा इशारा इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचे चेअरमन, लॉर्ड मॅकगॉवन, ह्यांनीं दिला आहे. कोळसा काढण्याची किंमत ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या सहा वर्षांत ७०% वाढली आहे. खाणींच्या तोंडाशी पडणारी कोळशाची दर टनी किंमत ग्रेटब्रिटनपेक्षा अमेरिकेंत ७½ रुपयांनीं कमी आहे. १९३३-३९ च्या ब्रिटिश कोळशाच्या उत्पादनाची वार्षिक सरासरी २२ कोटि ४० लक्ष टन होती; आतां उत्पादन १९ कोटि टनांवर आलें आहे. उत्पादनांतील घट थांबली व सध्याप्रमाणेंच उत्पादन चालू राहिलें आणि कोळशास युद्धाच्या पूर्वीइतकीच ग्रेटब्रिटनमध्यें मागणी राहिली, तर निर्गतीसाठी फक्त २ कोटि, २० लक्ष टन कोळसा राहील. १९३३-३९ मधील निर्गतीची सरासरी ५ कोटि, ४० लक्ष टन आहे!

### वृक्षभक्षक आगकाड्यांच्या पेट्या

ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धाच्या पूर्वीच्या काळांत आगकाड्यांच्या पेट्यांचा खप किती होत होता ह्याचे हिशेबी आकडे प्रसिद्ध झाले आहेत ते चित्तवेधक आहेत. त्या देशांत सरासरीनें दर दिवशीं प्रत्येक माणशीं पांच आगकाड्यांचा खप होत असे. प्रत्येक पेटींत पन्नास काड्या असतात असें समजलें तर प्रत्येक ब्रिटिशर दर रोज एकदशांश पेटी खपवीत असे असा हिशेब होतो. एक हजार पेट्या तयार करण्यास एक घनफूट लाकूड लागतें म्हणजे ब्रिटिश लोक दर दिवशीं चार हजार घनफूट लाकूड वापरीत होते असें झालें. एका वर्षांत ग्रेट ब्रिटन तीनशें एकरांचें जंगल आगकाड्यांसाठी फस्त करीत होते असा एकूण हिशेब होतो. युद्धपरिस्थितीमुळें हा लाकडाचा खप अर्थातच मर्यादित झालेला आहे.


### पुस्तकें व मासिकें ह्यांच्या किंमतींचें नियंत्रण

आयात होणारीं पुस्तकें, मासिकें व वृत्तपत्रें ह्यांची किंमत सरकारनें नियंत्रित केली आहे. १ शिलिंगाचा १ रुपया व १ डॉलरचे पांच रुपये, ह्यापेक्षा ज्यास्त पैसे किरकोळ विक्रींत घेतां येणार नाहींत. मुंबई व कराची येथें विकण्यांत यावयाच्या पुस्तकांची किंमत शिलिंगास १४ आणे एवढीच राहील. मासिकें व वृत्तपत्रें ह्यांच्या किरकोळीच्या विक्रीची किंमत १ शिलिंग = १ रु. ४ आ. व १ डॉलर=६ रु. १२ ह्या हिशेबानें आकारली पाहिजे. म्हणजे, ५ पेन्सचे ८ आणे व १० सेंटचे ११ आणे असा आकार होतो.


# बोला ज्योतिषीबुवा !

"प्रकाश"चा "रामराज्य" बोलपट अखिल भारतांत शहरोशहरीं गेल्या ऑगस्टपासून चालू आहे. पुण्यांत बारावा आठवडा चालू आहे. तरी खालील शहरीं कितव्या आठवड्यांत सुरू आहे हें सांगणाऱ्या

## ज्योतिषीबुवांचा योग्य सन्मान करू !




१२ वा आठवडा ! ] मिनर्व्हा, पुणें [ १२ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट!

दिग्दर्शक : विजय भट्ट

# रामराज्य

भूमिका:–शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहोनी.

रोज फक्त दोन खेळ ६॥ व १० वा. दर शनि. रवि. सोम. व अितर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥। वा.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १८ |
| २ गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा ... | १९ |
| ३ जपानवरील हल्ल्याची पूर्वतयारी ... | २० |
| ४ हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन ... | २० |
| ५ स्फुट विचार ... | २१ |
| प्रे. रूझवेल्ट ह्यांचें ध्येयात्मक धोरण—त्यांचा काँग्रेसला संदेश—आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था—; अमेरिकेंतील आंतरराष्ट्रीय परिषद | |
| ६ पौंड–डॉलर स्पर्धा ... | २२ |
| ७ अमेरिकन व्यापाऱ्यांची तक्रार ... | २२ |
| ८ बँकांच्या पासबुकासंबंधीं जबाबदारी ... | २३ |

# अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९४४

## गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा

मुंबई येथील शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर्स, मे. आर. आर. नाबर ॲन्ड कं., ह्यांनीं प्रतिवर्षाप्रमाणें "१९४३ चा आढावा व १९४४ संबंधीं अपेक्षा" * हें आपलें वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं प्रथम १९४३ ची युद्धप्रगति थोडक्यांत वर्णून हिंदी आर्थिक परिस्थितीवरील तिचे परिणाम अंतर्गत राजकीय आंदोलनांचे मानानें कसे प्रभावी झाले, हें सांगितलें आहे. १९४३ चे प्रारंभींच इराकनें शत्रूराष्ट्रांशीं युद्ध पुकारलें व आठव्या सैन्यानें ट्रिपोली सर केली. ह्यानंतर लवकरच स्टालिनग्राडची लढाई संपुष्टांत आली व पुढें दोन महिन्यांत संयुक्त राष्ट्रांची फौज सिसिलींत उतरली. २५ जुलै रोजीं मुसोलिनीनें राजीनामा दिला. इटली नंतर शरण आला. ह्यापुढील युद्ध म्हणजे इटलींतून जर्मनीस बाहेर काढणें, रशियानें जर्मनीस मागें रेटणें व जर्मन औद्योगिक केंद्रांवर बाँबहल्ले करणें, ह्या विविध स्वरूपाचें होतें. जपानचे हिंदी शहरांवरील बाँब हल्ले विध्वंसक ठरले नाहींत. ब्रह्मदेशावरील संयुक्त राष्ट्रांची मोहीम निराशाजनक ठरली तरी जपान्यांची पॅसिफिकमधील प्रगति थोपविण्यांत आली व चर्चिल-रूझवेल्ट–चँग काय शेक ह्यांनीं चढाईच्या धोरणाची आखणी केली. जर्मनीची शक्ती क्षीण होत चालली आहे, असें म्हणण्यांत येत आहे, तर कांहीं निरीक्षकांच्या मतें, जर्मनी शरण जाण्याजोगें विशेष कांहींच घडलेलें नाहीं, अशी वर्षअखेरची परिस्थिति आहे. जर्मनीला पादाक्रांत केल्यानंतरच जपानचा विचार करावयाचा आहे.

युद्धविषयक खर्चाचा परिणाम हिंदुस्थान सरकारच्या अंदाजपत्रकांत कसा दिसून आला, ह्याचें दिग्दर्शन करून, नाबर कंपनीच्या आढाव्यानें पुढें भरमसाट चलनवृद्धीची व लंडनमध्यें साठलेल्या हिंदी येण्यांची कारणमीमांसा केली आहे. संयुक्त राष्ट्रांसाठी हिंदुस्थानांत होणारा रुपयांतील खर्च, त्याचा लंडनमधील शिलका वाढण्यांत होणारा परिणाम, त्यामुळें होणारी हिंदी चलनवाढ, महागाई, जिनसांचें दुर्भिक्ष, इत्यादींच्या परिणामांचें परिमाण हिंदुस्थानच्या लंडनमधील कर्जाची परतफेड, रेल्वे डिबेंचर्सची परतफेड, हिंदुस्थानांतील ब्रिटिश गुंतवणुकीची गुंडाळणी, इत्यादि उपायांनीं मर्यादित होऊं शकलें नाहीं, हें खालील तक्ता दर्शवितो—

| | १-९-१९३९ | २५-१२-१९४२ | १७-१२-१९४३ |
|---|---|---|---|
| | ( आकडे हजार रुपयांचे आहेत ) | | |
| प्रचलित चलनी नोटा | १८२,१३,१७ | ५७०,३६,०१ | ८२०,५६,२३ |
| हिंदुस्थानाबाहेरील शिलका | १०,०८,३३ | ७०,९८,०० | १२९,६९,३९ |
| रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील स्टर्लिंग रोखे | ५९,५०,११ | ४०४,८३,३९ | ७१२,८३,९६ |
| मुंबईतील मजुरांच्या रहाणीच्या खर्चाचें मान | १०५ | १८८ | २४८(ऑक्टो.) |
| सोन्याची किंमत ( मुंबई ) | रु. ३९–५ | रु. ६६–१३ | रु. ७१–४ |
| चांदीची किंमत ( मुंबई ) | रु. ५१–११ | रु. ९८–८ | रु. ११४–१० |

चलनवृद्धीस आळा घालण्यासाठी सरकारनें कोणते प्रयत्न केले ? मार्च, १९४२ नंतर सोन्या-चांदीच्या बाजारांत भयंकर स्थित्यंतरें घडून आलीं. २६ एप्रिल रोजीं सोन्याचा भाव ९८ रुपये व चांदीचा भाव १३९ रुपये झाला. सरकारच्या फडनवीसांनीं जालीम उपाय योजून ही सट्टेबाजी थांबविण्याची तयारी दर्शविली, तीस अनुसरून मुंबईच्या सोनें बाजारांत वायद्याचे व्यवहार बंद करण्यांत आले व सोन्या–चांदीचे दर पुनः स्थिर झाले. डिलिव्हरीची मुदत सरकारनें १२ दिवसांची ठेवली होती, ती पुढें ४ दिवसांवर आणि नंतर फक्त दोन दिवसांवर आणून ठेवली. रिझर्व्ह बँकेनें ठराविक किंमतीस सोनें विकण्यास प्रारंभ केल्यापासून भावाचा चढीकडील कल नाहींसा झाला. वर्षअखेर सोनें व चांदी ह्यांचा बाजारभाव अनुक्रमें ७८ रु. १२ आ. व ११० रु. १२ आ. असा राहिला. जादा नफ्यावरील कराचे संबंधांतील ऑर्डिनन्स काढून सुमारें १०० कोटि रुपये खेचण्याचा सरकारनें प्रयत्न केला व नवीन भांडवल उभारणी मर्यादित करणारे व ब्रिटिश हिंदुस्थानांतून संस्थानांत भांडवलाचें स्थलांतर बंद करणारे हुकूमहि सरकारनें सोडले. भावनियंत्रणाचेहि कसून प्रयत्न सरकारनें चालविले. सोनें-चांदी व इतर कांहीं माल ह्यांचे तारणावरील कर्जाचें नियंत्रण सरकारनें केलें व पंजाबमधील बँकांजवळील गव्हाचे साठे ताब्यांत घेतले. कापड, औषधें, इत्यादि स्वस्त किंमतींत उपलब्ध करून देण्याची सरकारनें कोशीस केली व नफेबाजीविरुद्ध युद्ध पुकारलें. हें सर्व करूनहि, चलनविस्तार व महागाई हीं मर्यादित होण्यास आवश्यक ती जनतेची हार्दिक पार्श्वभूमि आढळून येत नाहीं व त्यामुळें चलनविस्तार आवरता घेणें सरकारास कठीण जात आहे असें दिसतें.

* "Review of the year 1943 and Prospects for 1944" पृ. सं. ६०, किं. २ रु.

## जपानच्या मायभूमीवरील हल्ल्याची पूर्वतयारी

### चीनला प्रभावी मदत कशी मिळेल !

जपानवरील अंतिम हल्ल्यास प्रारंभ कोठून व कसा केला पाहिजे, ह्यासंबंधीं लंडन टाइम्सच्या एका खास बातमीदारानें त्यासंबंधातील माहितीवर आधारलेले आपले विचार व्यक्त केले आहेत. जपाननें आपल्या भोंवतालचीं बेटें काबीज करून आपलें आरमार व अंतर्गत दळणवळण सुरक्षित करून ठेवलें आहे, त्यास धक्का देण्यासाठी चीनमार्गानेंच मुख्यतः प्रारंभ केला पाहिजे, असें त्याचें म्हणणें आहे. पॅसिफिक महासागरांतील जपान्यांच्या वर्चस्वाखालील बेटांनीं जपानी समुद्र सुरक्षित केला आहे व ही कोंडी फोडली पाहिजे, असेंहि तो म्हणतो. विशेषतः हिंदुस्थानांतून करावयाच्या चढाईचें दिग्दर्शन उद्बोधक होईल, तें खालीं दिलें आहे.

पूर्व आशियावर ( ज्याला पूर्वी "अतिपूर्व" असें म्हणत व ज्याला अमेरिकन लोक "ओरिअंट म्हणतात ) जपानचें आतां साम्राज्य पसरलेलें आहे. अगदी उत्तरेकडील कांहीं रशियन बेटें व स्वतंत्र चीनचे प्रांत, ह्यांवरच फक्त जपानचें वर्चस्व नाहीं. हिंदुस्थानाची पूर्वेची सरहद्द आतांपर्यंत शांत होती व त्या बाजूनें कधी शत्रूची स्वारी होईल, अशी कल्पनाहि नव्हती. परंतु, जपान्यांनीं जंगलांतूनहि मार्ग काढतां येतो, हें दाखवून दिल्यामुळें, हिंदुस्थानाचा लष्करी दृष्टिकोन पार पालटला आहे. चीनचा गाभा म्हणजे छेवान व आसाम ह्यांस जोडणारा शिकँग हा चिनी प्रांत आहे व त्याची रुंदी ५०० मैल आहे. हा सर्व डोंगराळ मुलूख आहे व कांहीं ठिकाणीं डोंगरांची उंची १२ हजार फुटांहून अधिक आहे. वाटेंतील दऱ्या ५ ते ७ हजार फूट खोल आहेत. त्यामुळें, रस्ता करण्यास हा प्रदेश सोईचा नाहीं. परंतु, वैमानिक वहातुक ह्या मार्गानें होऊं शकेल व ब्रह्मदेशांतील तळांवरून ह्या वहातुकीस अडथळा आणणें जपान्यांना शक्य होणार नाहीं. दक्षिणेकडे जसजसें यावें, तसतशी डोंगरांची उंची कमी होत जाते. पूर्वेकडे चीनचा युनान प्रांत व पश्चिमेकडे ब्रह्मदेश येतो. उत्तर ब्रह्मदेश डोंगराळच आहे व त्यांतूनच जाणारा "बर्मा-रोड" ब्रह्मदेश-युनानची सरहद्द कर्क-वृत्ताजवळ छेदतो. हिंदुस्थानांतून ब्रह्मदेशांत स्वारीसाठी निवडक फौजा पाठवून त्यांस विमानानें कुमक देतां आली, तरी ब्रह्मदेशांतून जपान्यांचें उच्चाटण करण्यास एवढा प्रयत्न पुरा पडणार नाहीं. बंगालच्या उपसागरांतून जलमार्गानेंच मोठा हल्ला करावा लागेल. बंगालचा उपसागर सिलोन व सुमात्रा ह्यांस जोडणाऱ्या रेषेपासून सुरू होतो व ह्या रेषेची लांबी १,००० मैल आहे. उपसागराचा गंगेच्या खोऱ्यापर्यंतचा दक्षिणोत्तर विस्तारहि १,००० मैलच आहे. उपसागराच्या मलाया ते ब्रह्मदेश-हिंदुस्थान सरहद्दीचा १५०० मैलांचा पूर्वकिनारा जपान्यांचे हातीं आहे व सुमात्रा, अंदमान व निकोबार हीं बेटेंहि जपान्यांचेच ताब्यांत आहेत. जपान सिंगापूरकडून ह्या बेटांच्या पिछाडीनें ब्रह्मदेशास सैनिक व साहित्य पाठवूं शकेल. जपान ते रंगून हें अंतर ४ हजार मैल आहे. ब्रह्मदेश व सयाम ह्यांतील रेल्वेचे रस्ते जोडून जपान्यांनीं सिंगापूर ऐवजी बँगकॉक ह्या १ हजार मैल जवळच्या बंदराचा उपयोग करण्यास प्रारंभ केला असणें शक्य आहे. ब्रह्मदेशावर जलमार्गानें स्वारी करावयाची, ती सुमात्रा व आराकान ह्यांचेमधील ७०० मैल रुंदीच्या वाटेनेंच करावी लागेल. ती यशस्वी झाली, म्हणजे "बर्मा रोड" खुला होईल व चीनला प्रभावी मदत जाऊं शकेल. परंतु, त्या रस्त्यानें होणाऱ्या वहातुकीस मर्यादा आहे व त्या रस्त्याच्या उपयोगानेंच केवळ जपानशीं निर्णायक युद्ध करतां येणार नाहीं. अर्थात, त्या रस्त्यावरून वहातुक सुरू केली, म्हणजे चीनला मदत मिळून यँगसी नदीच्या खोऱ्यांतून किनाऱ्यापर्यंत चिनी फौजा जाऊं शकतील व दोस्त राष्ट्रांना वैमानिक तळ उपलब्ध होऊन तेथून जपानी आगबोटींवर व कदाचित् प्रत्यक्ष जपानवरहि वैमानिक हल्ले करतां येतील. जपानी मातृभूमीच्या सभोंवारच्या बेटांत जपानी विमानें व आगबोटी ह्यांस आश्रय घेतां येतो. हीं सभोंवारचीं बेटें काबीज करणें, हा जपानवरील अंतिम हल्ल्याचा एक मार्ग आहे. परंतु चीनला दारूगोळा व युद्धसाहित्य पुरविण्याचा प्रयत्न हा अधिक महत्त्वाचा आहे. जपान भोंवतालच्या समुद्रावरहि अखेर वर्चस्व मिळवूनच जपानला शरण आणावें लागेल, हें उघड आहे.

### हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन

३१ मार्च, १९४३ अखेरच्या वर्षी हिंदी गिरण्यांत १५२३ कोटि पौंड सूत तयार झालें. १९४०–४१ चे मानानें हें उत्पादन १३·७% ज्यास्त असलें तरी १९४१–४२ चे मानानें तें २·८% कमी आहे. कापडाचे उत्पादनांतहि घट झाली, हें खालील आकडे दर्शवितील.

| वर्ष | उत्पादन ( कोटि वार ) |
|---|---|
| १९३८–३९ | ४२६ |
| १९३९–४० | ४०१ |
| १९४०–४१ | ४२६ |
| १९४०–४१ | ४४९ |
| १९४२–४३ | ४१० |

१९४२–४३ मधील कापडाच्या उत्पादनाचे तपशीलवार आकडे खालीं दिले आहेतः—

| | ( कोटि वार ) |
|---|---|
| मुंबई बेटें | १३९ |
| अहमदाबाद | ८५ |
| सर्वंद मुंबई प्रांत | २५१ |
| मद्रास | ११ |
| बंगाल | १७ |
| संयुक्त प्रांत | ३१ |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | १० |
| सर्वंद ब्रि. हिंदुस्थान | ३३७ |
| हिंदी संस्थानें | ७४ |
| सर्वंद हिंदुस्थान | ४११ |

### डावखोरे लोक

पाश्चात्य देशांत डावखोरेपणा कमी होत चालला आहे पण सैनिकांतील डावखोऱ्या लोकांचें प्रमाण वाढलें आहे. उजव्या हाताचाच उपयोग करणें योग्य आहे, ही समजूत चुकीची आहे असें आढळून आल्यापासून, डावखोऱ्या मुलांवर उजव्या हाताचा उपयोग करण्याची सक्ती आतां करण्यांत येत नाहीं.

# स्फुट विचार

## प्रे. रूझव्हेल्ट ह्यांचें ध्येयात्मक धोरण

इंग्लंड, रशिया व चीन ह्या राष्ट्रांस जर्मनी व जपान ह्यांचे विरुद्ध लढण्यांत अमेरिकेचें सांपत्तिक व मनुष्यबळ कार्यक्षम रीतीनें सहायकारक करून देण्यांत प्रे. रूझव्हेल्ट ह्यांचें ध्येयवादित्व व मुत्सद्देगिरी ह्यांनीं विलक्षण यश मिळविलें आहे. अमेरिकेच्या प्रेसिडेंटची निवडणूक चालू वर्षाचे अखेरीस व्हावयाची आहे, ह्या कारणानें त्या देशांत एव्हांपासून राजकीय स्वरूपाच्या विचारांचीं व चर्चेचीं आंदोलनें चालू झालीं आहेत. प्रे. रूझव्हेल्ट निवडणुकीस पुन्हां एकवार उभे रहाणार आहेत किंवा नाहीं हें अजून निश्चित झालेलें नाहीं. तथापि, त्यांची कारकीर्द इतकी दीर्घकालीन झाली आहे कीं अमेरिकन राष्ट्राच्या पुढारीपणाची धुरा आणखी चार वर्षांच्या मुदतीसाठी ते उचलतील किंवा कसें हें सांगतां येत नाहीं. चालू युद्धासारख्या अजस्त्र व जगड्व्याळ रणकंदनांत स्वतःच्या राष्ट्रास मोठ्या प्रमाणावरील स्वार्थत्याग करण्यास उद्युक्त करतांना त्यांनीं जागतिक शांतता, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व सर्व लोकांचें आर्थिक स्वातंत्र्य ह्यांची प्राप्ती व संरक्षण ह्या विषयींचें ध्येय सतत डोळ्यांपुढें ठेवलें आहे आणि विरोधास न जुमानतां आपली उच्च भूमिका पुन्हां पुन्हां विशद करून सांगण्याची संधी ते वाया जाऊं देत नाहींत. युद्ध म्हटलें म्हणजे जनतेची गैरसोय व स्वार्थत्याग हीं अपरिहार्यच आहेत. आकुंचित वृत्तीचे टीकाकार ह्या गोष्टीचा फायदा घेऊन प्रे. रूझवेल्ट ह्यांच्या धडाडीच्या व ध्येयात्मक धोरणास नाकें मुरडीत आहेत आणि त्या प्रवृत्तींत राजकीय विरोधाचा भाग असावा असें मानण्यास जागा आहे.

---

## त्यांचा काँग्रेसला संदेश

अमेरिकन काँग्रेसला पाठवलेल्या आपल्या वार्षिक संदेशांत प्रेसिडेंटांनीं टीकाकारांचा उत्कृष्ट समाचार घेतला आहे. जागतिक शांतता, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व लोकांचें आर्थिक स्वास्थ्य ह्यांची प्राप्ती जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमक वृत्तीच्या नाशानें होणार असल्यानें अमेरिकन जनतेनें आपले युद्धप्रयत्न कसोशीनें चालू ठेवून शत्रूचा पूर्ण पाडाव होईपर्यंत ढिले होऊं देतां कामा नयेत असें त्यांनीं बजावलें आहे. तसेंच, युद्धोत्तर काळांत अमेरिकेची अंतर्गत पुनर्घटना व्हावी लागेल आणि सामान्य जनतेची रहाणी सुखाची व निर्भयतेची होईल अशी व्यवस्था करावी लागेल असेंहि त्यांनीं सांगितलें. आतां काय युद्ध संपल्यासारखेंच आहे ह्या भ्रामक समजुतीनें बेफिकिरपणानें वागणारांची त्यांनीं कानउघाडणी केली असून, आंतरराष्ट्रीय व अंतर्गत राष्ट्रीय जीवनांत शांतता, समता व स्वातंत्र्य ह्यांची स्थापना न झाल्यास आतांपर्यंत झालेला व पुढें होणारा स्वार्थत्याग फुकट जाईल असें त्यांनीं म्हटलें आहे. कैरो व तेहरान येथें झालेल्या चर्चेंत गुप्त करार कोणतेहि झाले नसून युद्ध लवकर यशस्वी करणें व युद्धसमाप्तीनंतर जागतिक शांततेची भक्कम पायावर स्थापना करणें ह्या बाबतींतच एकमतानें निर्णय करण्यांत आले असें आश्वासन प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं देऊन शंकेखोर टीकाकारांस गप्प बसविलें आहे. त्यांचा संबंध संदेश स्पष्टोक्तिपूर्ण व स्फूर्तिदायक असा आहे आणि त्याचा अनुकूल परिणाम युद्धाची गति व युद्धोत्तर व्यवस्था ह्यांचे वर झाल्यावांचून रहाणार नाहीं. अमेरिकन राष्ट्राचें नेतृत्व युद्ध संपून जगाची नवीन घडी बसेपर्यंत त्यांच्याच हातीं रहावें अशी सर्व सुवृत्त माणसांची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

## आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था

जगाची युद्धोत्तर पुनर्घटना समाधानकारक रीतीनें घडून येण्यास निरनिराळ्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य, त्यांचे राजकीय हक्क व त्यांच्या राज्यांच्या मर्यादा ह्यांचा निश्चय सर्वांच्या अनुमतीनें व्हावा लागेल. असें न झाल्यास पुढील युद्धाचीं बीजें जागतिक भूमीमध्यें पेरून ठेवल्यासारखें होईल. रशियन सेना जर्मनीस मागें हटवीत मूळच्या पोलंडच्या प्रदेशांत येतांच तेथील राजकीय सत्तेचा अवघड प्रश्न इंग्लंडमध्यें वास्तव्य करीत असलेल्या स्वतंत्र पोलिश समितीनें उपस्थित केला ह्यावरून प्रदेशांच्या युद्धोत्तर वाटणीचें काम किती अवघड होणार आहे ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. प्रस्तुत युद्धाचे प्रारंभीं रशियानें व्यापलेला पोलंड देशहि आपल्या सत्तेखालीं आला पाहिजे असें पोलिश समितीचें म्हणणें आहे, पण त्यास पूर्णत्वानें मान्यता दिली जाईल असें दिसत नाहीं. राष्ट्रीय प्रदेशांच्या निश्चिती इतकेंच महत्त्व युद्धोत्तर काळांतील आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व्यवस्थेस येणार आहे. राष्ट्रांचें स्वातंत्र्य व सुस्थिति त्यांच्या आर्थिक अवस्थेवर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे आणि ही अवस्था आंतरराष्ट्रीय व्यापार व विनिमय ह्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेनें निर्णीत होणार आहे. गेल्या महायुद्धानंतर चलन व हुंडणावळ ह्यांचे संबंधांत प्रमुख राष्ट्रांचें एकमत न होऊं शकल्यामुळें जगाच्या व राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीवर अनिष्ट परिणाम झाले. हुंडणावळीच्या दराबाबत राष्ट्रांमध्यें स्पर्धा चालू झाली आणि तिच्यामुळें राष्ट्रीय उद्योगधंदे व व्यापार ह्यांची घडी नीट बसण्याचे मार्गांत अडथळे उत्पन्न झाले. ह्या कटु अनुभवावरून बोध घेऊन इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तज्ज्ञांचा आंतरराष्ट्रीय चलन व हुंडणावळ ह्यांची युद्धोत्तर घडी बसण्याचें हेतूनें योजना तयार करण्याचा उपक्रम चालू झाला. त्याप्रमाणें ब्रिटिश व अमेरिकन तज्ज्ञांनीं स्वतंत्र योजना आखल्या.

---

## अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय परिषद

आंतरराष्ट्रीय देवघेव सुलभ व्हावी म्हणून निरनिराळ्या राष्ट्रांच्या चलनाचे परस्पर संबंध निश्चित करणें आणि व्यवहारांत हे संबंध प्रभावी व्हावे ह्यासाठी जागतिक चलननिधीची तरतूद करणें हे मुख्य उद्देश ह्या दोन्हीं योजनांच्या मुळाशीं आहेत. तथापि, ह्या निधीची घटना, त्याचें स्वरूप व त्याचा उपयोग ह्यांचे संबंधांत दोहोंमध्यें महत्त्वाचे फरक आहेत. ते नाहींसे किंवा मर्यादित करण्याचे प्रयत्न चालू असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. अशा स्थितींत ह्या संबंध प्रश्नाची चर्चा करण्याकरितां जगांतील चव्वेचाळीस राष्ट्रांस आपापले प्रतिनिधि आपण भरवीत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेस पाठवावे अशीं निमंत्रणें अमेरिकेनें पाठविलीं असल्याच्या ताज्या वृत्तामुळें इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रें आश्चर्यचकित झालीं आहेत. आंतरराष्ट्रीय चर्चेचा हा प्रश्न विशद होण्याइतकी प्राथमिक तयारी झाली नसतां एकाएकीं प्रातिनिधिक स्वरूपाची जागतिक परिषद भरवण्याचें अमेरिकेनें ठरविलें कसें ह्याविषयीं त्यांनीं कुतूहल व चिंता प्रकट केली आहे. सोव्हिअट रशियास सुवर्णाधिष्ठित आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था हवी आहे, आणि त्या राष्ट्राचे प्रतिनिधि नियोजित परिषदेच्या चर्चेंत भाग घेतील असें दिसतें. आंतरराष्ट्रीय चलननिधि व आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवस्थेसाठी जागतिक बँकेची स्थापना असल्या अमेरिकन व ब्रिटिश योजनांच्या अंगांविषयीं मात्र रशिया उदासीन आहे असें म्हणतात.

### पौंड आणि डॉलर ह्यांची स्पर्धा

हिंदुस्थानांतील चलनवाढीबरोबर तिचा आधार म्हणून लंडनमध्यें जमा होणाऱ्या स्टर्लिंगच्या रकमा वाढत आहेत आणि युद्धाचे अखेरीस त्यांची बेरीज बाराशे–तेराशे कोटि रुपयांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. एवढी मोठी रकम हिंदुस्थानांत परत कशी आणावयाची हा मोठा बिकट प्रश्न आहे. युद्ध चालू असतांना यंत्रसामुग्रीसारखा उत्पादक स्वरूपाचा माल इंग्लंडमधून आणून त्याच्या किंमतीची भरपाई त्या शिलकेमधून करणें शक्य दिसत नाहीं. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानास परदेशांतून माल आणावा लागेल त्यावेळीं लंडनमधील शिलकांचा उपयोग होईल आणि हुंडणावळीची अडचण न भासतां हा व्यवहार पुरा पाडतां येईल. परंतु अमेरिकेसारख्या अन्य देशांत ह्या देशांतील धंदेवाल्यांस व व्यापाऱ्यांस आवश्यक वाटणारा माल सोइस्कर व स्वस्त मिळण्यासारखा असेल तर हिंदुस्थानचे पैसे लंडनमध्यें शिल्लक आहेत ह्या कारणास्तव अमेरिकन मालाच्या आयातीच्या मार्गांत अडचणी उपस्थित होऊं दिल्या जाऊं नयेत अशी मागणी ह्या देशांत केली जात आहे, ती सरळ आहे. अमेरिकेंतून माल आणावयाचा म्हणजे डॉलर्समधल्या हुंड्या येथें उपलब्ध पाहिजेत आणि त्या देशांत जाणाऱ्या हिंदी मालावरच त्या निघणार. तेव्हां जरूर पडेल त्याप्रमाणें लंडननें हिंदुस्थानला डॉलर हुंड्या पुरवण्याची व्यवस्था करावी लागेल. युद्धपरिस्थितींतहि हिंदुस्थानच्या डॉलर हुंड्यांचें स्टर्लिंग पौंडांत ब्रिटिश सरकार रूपांतर करीत आहे आणि अशा रीतीनें अमेरिकन माल ह्या देशांत येण्यास प्रतिबंध करीत आहे अशा आशयाच्या तक्रारी अमेरिकन व्यापारी करीत आहेत.

---

### अमेरिकन व्यापाऱ्यांची तक्रार

त्यांचें असें म्हणणें आहे कीं, ब्रिटिश सरकारच्या सांगीवरून हिंदुस्थान सरकार शक्य तोंवर अमेरिकन माल न आणावयाचें धोरण अवलंबीत आहे आणि ह्या देशाचा व्यापार इंग्लंडच्या हातीं ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. ह्या आरोपाचा इन्कार ब्रिटिश पत्रें तीव्रतेनें करीत आहेत. हिंदुस्थानांत डॉलर हुंड्या मुळीं फारशा निघतच नाहींत आणि हा देश स्टर्लिंग गटाचा एक घटक असल्यामुळें त्याचीं परराष्ट्रीय देणीं स्टार्लिंगमध्यें इंग्लंडांत जमा होणें अपरिहार्य आहे व इतर देशांतून आयात होणाऱ्या मालाच्या किंमतीची फेड लंडनमार्फत होण्याची व्यवस्था आहे असें उत्तर ब्रिटिश पत्रें देत आहेत. डॉलर हुंड्या हिंदुस्थानांतून आल्या तर त्यांचा विनियोग इंग्लंड अमेरिकेचें देणें देऊन टाकण्याकडे करीत आहे आणि असें न केल्यास उधार–उसनवार पद्धतीनें अमेरिकेकडून इंग्लंडला माल घ्यावा लागेल. हिंदुस्थानचे लंडनमधील हजार–बाराशे कोटि रुपये मोकळे होण्यास इंग्लंडला त्या किंमतीचा माल ह्या देशास पुरवला पाहिजे किंवा त्या प्रमाणांत आपल्या हिंदी मालाची आयात मर्यादित करावी लागेल असें एक ब्रिटिश पत्र म्हणतें. युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडला जरूरीचा परदेशी माल आयात करावा लागेल ह्या दृष्टीनें केवळ हिंदी बाजारपेठ आपल्या हातीं ठेवण्यासाठी हिंदी माल आयात न करतां इकडे स्वतःचा माल पाठवीत रहाणें इंग्लंडला परवडणार नाहीं असें सद्यःस्थितीचें समर्थन दुसऱ्या पत्रानें केलें आहे. डॉलर हुंड्यांचा तुटवडा पडून अमेरिकन मालाची आयात मर्यादित होईल हा अंदाजच ह्या पत्रास मान्य नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें प्रस्तुत प्रश्नासंबंधानें निष्कारण गैरसमज उत्पन्न झाला आहे तो दूर होणें अगत्याचें आहे असें त्याचें म्हणणें आहे.

### बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर १९४३ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास मागील वर्षांतील ओढलेले ९,४४,५७९ रु. ० आ. ८ पै धरून एकूण झालेला नफाः—

| | रु. आ. पै |
|---|---|
| | ५२,४५,८२७—४—५ |
| चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स देण्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद | १५,००,०००—०—० |
| ३० जून १९४३ रोजीं पहिल्या सहामाहीचें ११% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें त्याबद्दल दिलेली रकम | ५,५०,०००—०—० |

नफा वाटणीकरतां आतां ३१,९५,८२७ रु. ४ आ. ५ पै रहातात.

---

| | |
|---|---|
| ३१ डिसेंबर १९४३ अखेरच्या सहामाहीचें ११% दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें सुचविलें आहे | ५,५०,०००—०—० |
| प्रत्येक भागास ८ आ. ( १% इतकें ) बोनस | १,००,०००—०—९ |
| बँकेच्या मालमत्तेचे खातीं वर्ग | ३,००,०००—०—० |
| मुख्य कचेरीच्या नव्या मालमत्तेसाठीं रिझर्व्ह | ६,५०,०००—०—० |
| बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | २,५०,०००—०—० |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठी (नोकरवर्गास बोनस दिल्यास तो यांतून द्यावयाचा आहे) | १३,५०,८२८—४—५ |

### हिंदुस्थानांत पाठविण्याच्या नोकरांचें पूर्वशिक्षण

ईस्ट इंडिया कंपनीचे अमदानींत हिंदुस्थानांत पाठविण्यांत येणाऱ्या उमेदवारांना हिंदी भाषा, वाङ्मय व संस्कृति ह्यांचें शिक्षण देण्यांत येत असे व फोर्ट विल्यम येथें हिंदुस्थानांतहि त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था होती. ही योजना पुनः सुरू केली पाहिजे; लष्करी व बिनलष्करी खात्यांतील नोकरांना त्याचप्रमाणें व्यापारी फर्ममधील नोकरांनाहि अशा तऱ्हेचें शिक्षण देण्यास प्रारंभ करणें आवश्यक आहे; कंपनीचें राजवटींत हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचेमधील दुवा आतांपेक्षा जास्त बळकट होता, असें मि. एच. जी. रॉलिन्सन ह्यांचें म्हणणें आहे.

### डॉक्टर व औषध विक्रेत्यांवरील निर्बंध

औषध विक्रेत्यांवरील निर्बंध रोग्यांना औषधें देणाऱ्या डॉक्टरांस लागू नाहीं.

---


## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## बँकर व खातेदार यांजवरील पासबुकासंबंधीं जबाबदारी

आपल्या खातेदाराच्या उपयोगासाठीं बँकेमधील त्याच्या खात्याचा उतारा बँकर त्यास एका पुस्तकांत लिहून देतो त्यास पासबुक असें म्हणतात. खातेदारानें स्वतःच्या वहींत बँकेशी झालेल्या व्यवहारांच्या नोंदी जशा केल्या असत्या तशा नोंदी खातेदाराच्या पासबुकांत लिहून देण्याचा प्रकार कांहीं बँकांमधून अस्तित्वांत आहे.

कांहीं बँका खातेदारांना पासबुकें देण्याऐवजीं त्यांना त्यांचा खातेउतारा दर कांहीं ठराविक दिवसांनीं देत असतात. पास बुकें लिहून देण्याचा मूळ उद्देश खातेदार व बँकर यांचेमध्यें झालेल्या व्यवहारांचा चोख हिशेब दोघांनाही कळावा व तशा तऱ्हेचा लेखी पुरावा रहावा असा आहे. यासाठीं पासबुक लिहून झाल्यानंतर तें तपासून देण्याचा प्रघात आहे.

पास-बुकामध्यें खातेदारानें स्वतः कोणतीही नोंद अगर दुरुस्ती करावयाची नसते.

खातेदारानें स्वतः अगर कोणामार्फत तरी बँकेंतून आपलें पासबुक नेल्यानंतर तें स्वतःच्या हिशेबाशीं पडताळून पाहिलें पाहिजे. परंतु कित्येक वेळां सर्व खातेदार असें करतातच असें नाहीं. कित्येक वेळां तें तसेंच परत केलें जातें. वास्तवीक पहातां खातेदारानें बँकेंतून पुस्तक भरून नेल्यावर त्यांतील नोंदी आपल्या व्यवहाराशीं पडताळून पाहून त्यांत कांहीं चूक आढळल्यास योग्य मुदतींत ती चूक बँकरच्या नजरेस आणून दुरुस्त करून घेतली पाहिजे व तशा तऱ्हेचें बंधन अमेरिकेमध्यें खातेदारावर आहेही. परंतु आपणांकडे तशा तऱ्हेचें बंधन नसल्यामुळें पास-बुक बिनचूक भरून देण्याची जबाबदारी सर्वस्वी बँकरवर पडते.

पास-बुकामध्यें ज्या चुकीच्या नोंदी होतात त्या कधीं खातेदाराचे दृष्टीनें अनिष्ट अगर इष्ट असूं शकतात, परंतु सर्वचवेळीं चुकीच्या नोंदी होणें बँकरच्या दृष्टीनें अनिष्ट असतें. अशा चुकीच्या नोंदीचा उपयोग खातेदार बँकरविरुद्ध पुरावा म्हणून उपयोगांत आणूं शकतो.

खातेदाराच्या पासबुकांत चुकीनें जर जास्त शिल्लक दाखविली असेल व ती शिल्लक खरी आहे असें समजून जर खातेदारानें त्या रकमेचा चेक बँकेवर काढला तर तो चेक बँकरला सत्कारावा लागेल व त्याची नुकसानी बँकरला भरावी लागेल. मात्र बँकरनें दिलेल्या चुकीच्या नोंदीमुळेंच ही गोष्ट झाली असें खातेदाराला सिद्ध करतां आलें पाहिजे.

एकंदरींत पासबुकें भरून देतेवेळीं त्यांत लिहिलेल्या नोंदींची जबाबदारी खातेदारापेक्षा बँकरवर अधिक आहे हें ध्यानांत घेऊनच बँकरनें तीं पुस्तकें भरून देतेवेळीं त्या नोंदी बरोबर आहेत कीं नाहीं याची स्वतः पूर्ण खात्री करून पासबुकें खातेदारांस द्यावींत.

एच. व्ही. सहस्रबुद्धे


# विषारी फूत्कार—!

एकेक शब्द म्हणजे विषारी सापाचे फूत्कार! हा सर्प चावला पांडवांना पण विष भिनलें कौरवांना!

कौरवांचा निःपात उडाला! महात्मा विदूर विमानांतून स्वर्गीं गेले!

रॉयल रत्न १८ वें

# ★ महात्मा विदुर ★

दिग्दर्शकः—पार्श्वनाथ आळतेकर | कलाः—बाबूराव पेंटर

भूमिकाः—अखंड-अजोड नटरत्न विष्णुपंत पागनीस, अजोड अभिनय सम्राज्ञी दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

५ वा आठवडा— पुण्यांत ५ वा आठवडा —५ वा आठवडा

मराठी भाषेंत

## आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ दुपारी ३।, ६॥ व १० वाजतां.

दर रविवारीं सकाळीं १० वाजतां.

हिंदी भाषेंत

## न्यू अपोलो, पुणें

दररोज फक्त एक खेळ रात्रौ ११ वाजतां.

रिझर्वेशन सकाळीं १० ते १२ दुपारीं ३ चे पुढें. (आर्यन) तिकिटांचे दर (सरकारी करासह):—बॉक्स रु. १-१२-०, फर्स्ट क्लास रु. १-०-०, फॅमिली सर्कल आ. १०, सेकंड क्लास आ. ९, पिटर क्लास आ. ५, थर्ड क्लास आ. ४, कुलीन स्त्रियांस आणे १०॥.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

**टोमॅटो केचप ( गोड ) व**

**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

**दत्त कंपनी**

७१५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**विमेदार नि हवाई हल्ला**

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

**ट्रस्ट ऑफ इंडिया**

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

**ट्रस्ट ऑफ इंडिया**

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

**पुना गेस्ट हाऊस**

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व